# निशाणी क्र. १९९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १७ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १७ गोविंद उर्फ बाबा नारायण धुवाळी हे दि. २७/०४/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. मात्र मार्च २०२० पासून कोव्हीड १९ या माहामारीमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन झाल्यामुळे तसेच सदर कालावधीत दिवाणी कामकाज बंद असल्यामुळे तसेच दिवाणी कोर्टामध्ये अर्जंट दादींकरीता कोर्ट काम चालू असल्यामुळे पक्षकार कोर्टात हजर राहू शकत नव्हते. तसेच, या कामातील वादी हे सुमारे ७० वर्षाचे वयोवृध्द इसम आहेत वर नमुद प्रतिवादी क्र. १७ चे वारस रेकॉर्डवर आणण्यास ३ महिने १४ दिवस इतका विलंब झाला आहे. त्यामुळे प्रस्तूत प्रतिवादी विरुध्द दावा अबेट झाला आहे. तरी, प्रस्तूत प्रतिवादी क्र. १७ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तूत प्रतिवादी क्र. १७ हे दि. २७/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: १७/११/२०२१